केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रमांसाठी आदिवासी जनजाती उपयोजनेंतर्गत (TSP) करीता सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ साठी प्रलंबित केंद्र हिश्श्यापोटी रु.१०४४८.१३ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः राआअ-२०१७/प्र.क्र.२२३/आ-७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें.हि./ २४८१९-८२५/ २०१७-१८, दिनांक २२ जून, २०१७ चे पत्र.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र. ०५/कार्यासन-६, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह, सर्व प्रकारच्या गरजूंना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने आरोग्य विषयक सर्व केंद्र पुरस्कृत योजना एकत्रित करुन त्यास "राष्ट्रीय आरोग्य अभियान" असे नाव दिले. या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आता राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनांचा समावेश केला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान या केंद्र पुरस्कृत योजने करीता आदिवासी जनजाती उपयोजनेंतर्गत (TSP) करीता सन २०१७-१८ च्या मंजूर अर्थसंकल्पीत तरतूदीतून प्रलंबित केंद्र हिस्सा राज्य

आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या विविध कार्यक्रम याकरीता आदिवासी जनजाती उपयोजनेंतर्गत (TSP) लाभार्थ्यांकरिता सन २०१७-१८ च्या मंजूर अर्थसंकल्पीत तरतुदीतून सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ मधील रु. १०४४८.१३ लक्ष इतका प्रलंबित केंद्र हिस्सा वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर केंद्र हिश्श्यामधील खर्च मागणी क्र.टी-५, २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०६-सार्वजनिक आरोग्य; ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना शिर्षाखाली रु. १०४४८.१३ लक्ष इतका निधी खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ मधील प्रलंबित केंद्र हिस्सा

(रु.लाखात)

अ.क्र.	योजना	लेखाशीर्ष	मजूंर तरतूद
१	२	३	४
१	राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)	२२१०F७३८	९३६२.००
२	राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)	२२१०F७४७	४७३.००

३	राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण	२२१०F७६५	५७.२०
४	सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम	२२१०F७५६	२२०.०९
५	राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम	२२१०F७९२	१२६.४६
६	राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम	२२१०F८३६	२६.९९
७	राष्ट्रीय वृध्दापकाळ आरोग्य शुश्रुषा कार्यक्रम	२२१०F८१८	२९.७४
८	कर्करोग, मधुमेह, ह्रदयरोग व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम	२२१०F८५४	१०८.१७
९	राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम	२२१०F७८३	१८.०९
१०	राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम	२२१०F८०९	२६.३९
	एकूण		१०४४८.१३

५. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिच्छेद ७ ते १८ व सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

७. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र. १२८/अर्थ-१९, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३११७०४०८७४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandit Jadhav

Digitally signed by Pandit Jadhav
DN: CN = Pandit Jadhav, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.02 13:14:38 +05'30'

(पंडीत जाधव)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
६. सहाय्यक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१२.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग.
१३. निवडनस्ती (आरोग्य-७) .